# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. १६/१२/२०१५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा बुधवार दिनांक १६/१२/२०१५ रोजी सभा सुचना क्र. १४ दि. ०५/१२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात दुपारी १२.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठसीन अधिकारी, श्रीम. अश्विनी जोशी, जिल्हाधिकारी, ठाणे ह्या उपस्थित होत्या. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सदस्य |
| २. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ३. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |
| ६. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ७. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| ८. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |
| ९. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| १०. | श्री. दिनेश तेजराज जैन | सदस्य |
| ११. | श्री. प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे | सदस्य |
| १२. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| १३. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| १४. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| १५. | ॲड रवि व्यास | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा बुधवार दि. १६/१२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १४, दि. ०५/१२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ११६, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१५-१६ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत. गुरुवार दि. १०/१२/२०१५ रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत नामनिर्देशन पत्र स्विकारण्याची वेळ होती. सदरच्या वेळेमध्ये खालील सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे सादर केली. १) श्री. आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र २) श्रीम. डिसा मर्लिन मर्विन. ३) श्री. प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे सदरचे नामनिर्देशन मी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करतो.

अश्विनी जोशी (पिठासीन अधिकारी) :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१५-१६ या सालाकरीता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती, स्थायी समिती म्हणून नेमणूक करणे. हा विषय आजच्या विशेष मा. स्थायी समिती सभेचा आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अधिसुचना नियम २००६ मधील नियम ५ नुसार विशेष बैठक बोलविण्याची जी तरतुद आहे त्याच्यामध्ये विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असतील हे त्याच्यामध्ये उपस्थित असतात. महाराष्ट्र महानगरपालिका नियम २००७ मधील नियम २ मधील शासन अधिसुचना दि. १२/१२/२००८ नुसार मा. विभागीय आयुक्त यांनी दि. ०५/१२/२०१५ चे आदेशान्वये सदर निवडणूकीसाठी मला पिठासीन अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २, कलम २१, पोटकलम (१) अन्वये (१) श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र, (२) श्रीम. डिसा मर्लिन मर्विन व ३) श्री. प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे ह्यांची नामनिर्देशन पत्रे पाहिली आहेत. ती योग्य आहेत. छाननी अंती (१) श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र, (२) श्रीम. डिसा मर्लिन मर्विन व ३) श्री. प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे यांचे नामनिर्देशन पत्र वैध आहेत. हे जे तीन उमेद्‌वार आहेत (१)

श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र, (२) श्रीम. डिसा मर्लिन मर्विन व ३) श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे यांच्यामध्ये कुणाला उमेदवारी जर मागे घ्यायची असेल तर त्यांना १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. वेळ १२.२५ ते १२.४०. अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा अवधी दिला असताना श्री. प्रभाकर म्हात्रे यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्यामुळे एकुण २ उमेदवार शिल्लक राहिलेले आहेत. ''सभापती'' पद हे एकच असल्याने आणि उमेदवार दोन असल्याने हात वर करुन मतदान घेण्यात येईल. सर्वप्रथम श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र यांना मत देणाऱ्यांनी हात वर करायचे आहेत व सही करायची आहे. श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र यांना ०९ इतकी मते मिळाली आहेत. श्रीम. डिसा मर्लिन मर्विन यांना मत देणाऱ्यांनी हात वर करावेत व सही करायची आहे. श्रीम. डिसा मर्लिन मर्विन यांना ०६ इतकी मते पडली आहेत. श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र यांना श्रीम. डिसा मर्लिन मर्विन ह्यांच्या पेक्षा जास्त मते पडली आहेत श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र यांची निवडून आल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाकरिता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे. नवनिर्वाचित सभापतींचे अभिनंदन.

प्रकरण क्र. ११६ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१५-१६ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

ठराव क्र. :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमय चे प्रकरण २, कलम २१, पोटकलम (१) अन्वये (१) श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र, (२) श्रीम. डिसा मर्लिन मर्विन व ३) श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे ह्यांनी आपली नामनिर्देशन पत्र दाखल केली. नामनिर्देशन पत्रांची छाननी केली असता सर्व नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत. प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया सुरु होणेपुर्वी नियमानुसार उमेदवारांस आपले नामनिर्देशन पत्र मागे घेणे करिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे ह्यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने एकुण दोन उमेदवार शिल्लक राहिले. ''सभापती'' पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन असल्याने हात वर करुन मतदान घेतले असता (१) श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र ह्यांना ०९ इतकी मते (२) श्रीम. डिसा मर्लिन मर्विन ह्यांना ०६ इतकी मते मिळाली. एक सदस्य गैरहजर आहेत.

<u>श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-</u>

१) श्री. प्रशांत केळुसकर
२) श्री. हरिश्चंद्र आमगावकर
३) श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे
४) श्री. शरद केशव पाटील
५) श्री. दिनेश जैन
६) ॲड. रवि व्यास
७) श्री. मोहन महादेव जाधव
८) श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील
९) श्री. मुन्नासिंग

<u>श्रीम. डिसा मर्लिन मर्विन ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-</u>

१) श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा
२) श्री. नरेश तुकाराम पाटील
३) श्री. वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा
४) श्री. सुहास माधवराव रकवी
५) श्रीम. डिसा मर्लिन मर्विन
६) श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन

| | | |
|---|---|---|
| <u>तटस्थ सदस्यांची नांवे –</u> निरंक | | |
| मतदानावेळी एकूण हजर सदस्य | :- | १५ |
| <u>श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र</u> ह्यांच्या बाजूने एकुण मते | :- | ०९ |
| <u>श्रीम. डिसा मर्लिन मर्विन</u> ह्यांच्या बाजूने एकुण मते | :- | ०६ |
| तटस्थ | :- | ०० |
| अनुपस्थित सदस्य | :- | ०१ |
| एकूण | :- | १६ |

श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र ह्यांना जास्त मते मिळाल्याने श्री. आमगांवकर हरिश्चंद्र रामचंद्र, यांची निवडून आल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाकरिता सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

सही /-
पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

नवनिर्वाचित सभापतींचे मा. पिठासीन अधिकारी पुष्पगुच्छ देवून स्वागत करीत आहेत.

पिठासीन अधिकारी :-

ही निवडणूक प्रक्रिया संपल्याचे मी जाहिर करते.

(सभा संपल्याची वेळ दु. १२.४५ वा.)

सही/-
पिठासीन अधिकारी
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

